Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-III MARCH 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन

नितेश रा. बोरकर
रिसर्च स्कॉलर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रस्तावना

मानवाने जीवन साधन मिळविण्यासाठी किंवा धंदा म्हणून स्वत:च्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या करण्यात येते व स्थूलमानाने नैर्सगिक आणि आर्थिक घटकांमुळे शेतीच्या प्रकारात बदल होतात. प्राचीन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो व सध्याच्या काळात भारतात शेतीवर अवलंबित लोकसंख्या ६५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. किंबहुना भारताचा आर्थिक विकास शेती विकासावरच अवलंबून आहे. भारताची आर्थिक व औद्योगिक प्रगती झाली असली तरी अद्यापही बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे.

आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेत अन्नधान्यासाठी मानवाला प्रामुख्याने शेतीवर अवलंबून रहावे लागते. आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेतील देत म्हणजे अप्रगत देशात भांडवलाची टंचाई असते. म्हणून या देशातील आर्थिक विकासात मर्यादित भांडवल व विद्युत श्रमशक्ती याचा वापर करणे योग्य ठरते (कुंजीर, २००८). अप्रगत देशात अशी परिस्थिती असल्यामुळे शेती व्यवसायावर अधिक भर देणे आवश्यक आहे. शेती व्यवसाय हा औद्योगिकीकरणाचा कणा आहे. शेती सुधारली व येथील उत्पन्न वाढले तर कारखान्यात तयार होणाऱ्या मालाला मोठी बाजारपेठ मिळू शकते. औद्योगिकीकरण जसजसे होते तसतसे अन्नाची मागणी वाढते. अप्रगत देशात वाढती लोकसंख्या व अन्नमागणीची उत्पन्न लवचिकता अधिक असते. त्यामुळे अन्नोत्पादन वाढविण्यासाठी शेती सुधारणा जरूर असते (पुरोहित, २०१६).

संपूर्ण जगात उत्पादीत होणाऱ्या प्रमुख पिकांमधील धान हे एक महत्वाचे पीक आहे. भात हे प्रमुख खाद्यान्न धानापासुनच प्राप्त होते. जगात मक्का या पिकानंतर धानाचे उत्पादन मोठया प्रमाणात केले जाते. जगात इतर खाद्यान्नापेक्षा धानाला सर्वाधिक मागणी आहे. चीननंतर भारताचा धान उत्पादनात जगात दुसरा क्रमांक लागतो (कृषिसंवादिनी, २०१३). भारत जगातील धान उत्पादन करणारा महत्वाचा देश आहे. जगातील एकुण धान उत्पादनांपैकी २० टक्के धानाचे उत्पादन एकट्या भारतात होते. धान हे भारतातील एक महत्वाचे पिक आहे आणि देशातील पूर्व आणि दक्षिण भारतातील लोकांच्या जेवणातील एक मुख्य पदार्थ आहे. देशात धान उत्पादनासाठी सगळयात उपयुक्त जमिन आहे. धान लागवडीच्या अनेक पध्दती आहेत परंतु गडचिरोली जिल्ह्यात सामान्यत: दोन प्रकारच्या पध्दतींचा (आवत्या च रोवण्या) वापर केला जातो. धान पीक घेतांना प्रामुख्याने पुढील बाबींवर मोठया प्रमाणात खर्च होतो जसे पूर्वमशागत व भरखते, पेरणी, चिखलणी, रोवणी, रासायनिक खते, पाणी व्यवस्थापन, आंतर मशागत, इत्यादी. विदर्भात धान पिकाची लागवड प्रामुख्याने गडचिरोली, चंद्रपूर भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यात केली जात असून सर्वाधिक लागवड गडचिरोली जिल्ह्यात केली जात आहे (सागर, २०१६). धानशेती ही अनेक वर्षापासून या भागात केली जात असून सुद्धा देशाच्या सरासरी उत्पादकतेशी तुलना करता विदर्भातील धानपिकाची उत्पादकता अत्यंत कमी असून त्याची बरीच कारणे आहेत, या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक बाबींशी निगडित अध्ययन करण्यात आले. मुख्यत: गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला व त्यांच्या विकासावर परिणाम करणाऱ्या आर्थिक घटकाचा अभ्यास करण्यात आला.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे गडचिरोली जिल्ह्यातील शेतकरी जंगल कापून त्यामध्ये बांध बंदीस्ती करून धान बियाने टाकून शेती करीत असत; परंतु शासनाच्या हरितक्रांती योजनेमुळे शेतकऱ्यांना धान पिकाच्या लागवडीचे तंत्र अवगत झाले. परिणामत: त्यांच्या उत्पादनात हळूहळू वाढ व्हावयास सुरूवात झाली. त्यामुळे या शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक जीवनात कशाप्रकारे बदल झाला याची माहिती संकलित करण्यात आली. संशोधनकार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व उद्देशपूर्ती होण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टये अभ्यासून संशोधन करण्याकरीता सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला (घाटोळे, २००९). संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणुन गडचिरोली जिल्हा निवडण्यात आला.

अध्ययन विश्व, जनसंख्या व न्यादर्श

प्रस्तूत अध्ययनात गडचिरोली जिल्ह्यातील सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांचे अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला. न्यादर्श संपूर्ण जनसंख्येचा (गडचिरोली जिल्ह्यातील सर्व धान उत्पादक शेतकरी) एक भाग आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांचा जनसंख्या म्हणून विचार करण्यात आला.

नमुना निवड व न्यादर्श :

त्याचप्रमाणे संभाव्यता पद्धतीतील स्तरीय यादृच्छिक नमुना (जतंजपपिमक त्ंदकवउ ैउचसपदह) निवडण्यात आला आहे (बोधनकर व अलोनी, २००३). याकरिता जिल्ह्यातील एकूण १२ तालुके आणि १६८९ गावे आहेत. त्या प्रत्येक तालुक्यातील एकूण गावाच्या साधारणत: ५ टक्के गावाची निवड संशोधनासाठी करण्यात आली. या निवड करण्यात आलेल्या गावातील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या यासाठी त्या प्रत्येक तालुक्यात २ हेक्टर पर्यंतच्या आतील अल्पभुधारक शेतकरी ६९६१३, २ ते १० हेक्टरपर्यंत जमीन असलेले मध्यम शेतकरी ३७७००, १० हेक्टरपेक्षा जास्त जमीन असलेले मोठे शेतकरी १६०० आहेत. यांची एकूण संख्या १०८९१३ इतकी असून त्या प्रत्येक वर्गवारीमधील शेतकऱ्यांमधून ५ टक्के शेतकऱ्यांची निवड करण्यात आली (भांडारकर, १९९२).

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधनात निर्माण झालेल्या निष्कर्षाची संशोधन उद्देशाच्या दृष्टीने संबद्धता व संशोधन कार्यात मितव्ययता याची सांगड घालण्यात आली आहे. अर्थातच तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे (जरारे, १९९५).

तथ्य संकलनाकरिता संशोधनाची साधने :

प्रस्तुत अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून व वापर करून प्रश्नावली तयार करण्यात आली. व तथ्य संकलनासाठी सर्वेक्षण माध्यमाचा वापर करण्यात आला.

सांख्यिकिय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करून आलेख, विवेचन व पृथ:करण व सांख्यकीय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारिता व बहुलक काढण्यात आले.

त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरिता 'बिपुनंतम' जमेज चा वापर करण्यात आला. Significance Level ०.०५ निर्धारीत करण्यात आली.

सांख्यिकीय विश्लेषण व विवेचन

शेतकऱ्यांचा धानपिकावरील खर्च

सारणी क्र. १: गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानपिकावरील खर्चासंबंधी माहिती दर्शविणारी सारणी

धानपिकावरील खर्च	अल्पभुधारक शेतकरी		मध्यम शेतकरी		मोठे शेतकरी	
	मध्यमान	मा.वि.	मध्यमान	मा.वि.	मध्यमान	मा.वि.
मजुरीवरील खर्च	२४५००	˚२८५	१८३००	˚३१०	१४६२०	˚३८५
जमीनीवरील खर्च	१२००	˚११०	१३००	˚१४०	१३५०	˚९०
सिंचन खर्च	४००	˚५०	५००	˚६५	५५०	˚५५
संकरित बियांवरील खर्च	५५००	˚१२०	८२२०	˚२४०	८४००	˚२६०
किटकनाशकावरील खर्च	१६००	˚१४०	२८००	˚१५०	३०५०	˚१८०
रासायनिक खतावरील खर्च	१२००	˚१२०	२२००	˚१८०	२३००	˚१५०
रोवनीवरील खर्च	४५०	˚४०	४६०	˚४५	४५०	˚४०
कापनीवरील खर्च	९००	˚५०	८५०	˚४५	८००	६०
मळयावरील खर्च	४८०	˚४०	५२०	˚४०	४४०	˚३५

स्त्रोत: —प्राथमिक तथ्यांवरून प्राप्त झालेली माहिती

वरील **सारणी क्र. १** मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानपिकावरील खर्चासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार अल्पभुधारक शेतकऱ्यांचा कुटुंबातील मजुरीवरील खर्च २४५००˚२८५ असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च १८३००˚३१० तर मोठया शेतकऱ्यांचा खर्च १४६२०˚३८५ इतका असल्याचा आढळला. अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या जमीनीवरील खर्च १२००˚११० असून मध्यम शेतकऱ्यांचा १३००˚१४० तर मोठया शेतकऱ्यांचा जमीनीवरील खर्च १३५०˚९० इतका असल्याचा आढळला.

प्राप्त माहितीनुसार अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या जमीनीवरील सिंचनावरील खर्च ४००˚५० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च ५००˚६५ तर मोठे शेतकऱ्यांच्या जमीनीवरील सिंचनावरील खर्च ५५०˚५५ इतके असल्याचे आढळले. अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या जमीनीवरील संकरित बियांवरील खर्च ५५००˚१२० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च ८२२०˚२४० तर मोठे शेतकऱ्यांच्या खर्च ८४००˚२६० असल्याचा आढळला. अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या जमीनीवरील किटनाशकावरील खर्च १६००˚१४० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च २८००˚१५० तर मोठे शेतकऱ्यांच्या खर्च ३०५०˚१८० असल्याचा आढळला.

शोधकार्यात प्राप्त माहितीनुसार अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या रासायनिक खतावरील खर्च १२००˚१२० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च २२००˚१८० तर मोठे शेतकऱ्यांचा खर्च २३००˚१५० असल्याचा आढळला. अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या रोवनावरील खर्च ४५०˚४० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च ४६०˚४५ तर मोठे शेतकऱ्यांच्या खर्च ४५०˚४० असल्याचा आढळला. अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या कापनीवरील खर्च ९००˚५० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च ८५०˚४५ तर मोठे शेतकऱ्यांच्या खर्च ८००˚६० असल्याचा आढळला. अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या मळयावरील खर्च ४८०˚४० असून मध्यम शेतकऱ्यांचा खर्च ५२०˚४० तर मोठे शेतकऱ्यांच्या खर्च ४४०˚३५ असल्याचा आढळला.

कर्जविषयक माहिती

सारणी क्र. २: गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे स्त्रोतसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी

धानपिकाकरिता कर्जाचे स्त्रोत	अल्पभुधारक शेतकरी		मध्यम शेतकरी		मोठे शेतकरी	
	संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी
सहकारी बँक	२८०	५८.६	१५०	६२.५	५०	५४.३
राष्ट्रीय बँक	८२	१७.२	६६	२७.५	३२	३४.८
सावकार	९४	१९.७	८	३.३	२	२.२
नातेवाईक	२२	४.६	१६	६.७	८	८.७
एकूण	४७८	१००	२४०	१००	९२	१००

स्त्रोत: —प्राथमिक तथ्यांवरून प्राप्त झालेली माहिती

वरील **सारणी क्र.२** मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे स्त्रोतसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५८.६ टक्के अल्पभुधारक, ६२.५ टक्के मध्यम व ५४.३ टक्के मोठे शेतकऱ्यांनी सहकारी बँकेकडून धानपिकाकरिता कर्ज घेतला असून १७.२ टक्के अल्पभुधारक, २७.५ मध्यम व ३४.८ टक्के मोठे शेतकऱ्यांनी राष्ट्रीय बँकेकडून कर्ज घकतले असल्याचे आढळले. तसेच १९.७ टक्के अल्पभुधारक, ३.३ मध्यम व २.२ मोठे शेतकऱ्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले असून नातेवाईकांकडून कर्ज घेणारे अल्पभुधारक, मध्यम व मोठे शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण ४.६ टक्के, ६.७ टक्के व ८.७ टक्के असल्याचे आढळले.

धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याजदर

सारणी क्र. ३: गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याजदर दर्शविणारी सारणी

धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याजदर	अल्पभुधारक शेतकरी		मध्यम शेतकरी		मोठे शेतकरी	
	संख्या	अल्पभुधारक शेतकरी	संख्या	मध्यम शेतकरी	संख्या	मोठे शेतकरी
५:	२८८	६०.३	१५३	६३.८	२४	२६.१
८:	४८	१०.०	५०	२०.८	३८	४१.३
१०:	३२	६.७	१५	६.३	२०	२१.७
१२:	८८	१८.४	६	२.५	२	२.२
बिनव्याजी कर्ज	२२	४.६	१६	६.७	८	८.७
एकूण	४७८	१००	२४०	१००	९२	१००

स्त्रोत: —प्राथमिक तथ्यांवरून प्राप्त झालेली माहिती

वरील **सारणी क्र. ३** मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याज दरासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६०.३ टक्के अल्पभुधारक, ६३.८ टक्के मध्यम व २६.१ टक्के मोठे शेतकऱ्यांनी धानपिकाकरिता ५ (टक्के) व्याजदरावर कर्ज घेतला असल्याचे आढळले. तसेच १० टक्के अल्पभुधारक, २०.८ मध्यम व ४१.३ टक्के मोठे शेतकऱ्यांनी ८ (टक्के) व्याजदरावर कर्ज घेतले असल्याचे आढळले. अनुक्रमे १० व १२ (टक्के) व्याजदरावर कर्ज घेणारे अल्पभुधारकांचे शेकडा प्रमाण ६.७ टक्के व १८.४ टक्के तर मध्यम शेतकऱ्यांचा शेकडा प्रमाण ६.३ टक्के व २.५ टक्के असून मोठे शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण २१.७ टक्के व २.२

टक्के असल्याचे आढळले. अनुक्रमे बिनव्याजी कर्ज घेणारे अल्पभुधारक, मध्यम व मोठे शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण ४.६ टक्के, ६.७ टक्के व ८.७ टक्के असल्याचे आढळले.

धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड

सारणी क्र. ४: गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड या संबंधी माहिती दर्शविणारी सारणी

कर्जाची परतफेड	अल्पभुधारक शेतकरी		मध्यम शेतकरी		मोठे शेतकरी	
	संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी	संख्या	टक्केवारी
होय	८६	१८.०	७४	३०.८	५६	६०.९
नाही	३९२	८२.०	१६६	६९.२	३६	३९.१
एकूण	४७८	१००	२४०	१००	९२	१००

स्त्रोत: —प्राथमिक तथ्यांवरून प्राप्त झालेली माहिती

वरील **सारणी क्र. ४** मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड केली असण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार १८ टक्के अल्पभुधारक, ३०.८ टक्के मध्यम व ६०.९ टक्के मोठे शेतकऱ्यांनी धानपिकाकरिता घेतलेल्या कर्जाची परतफेड केली असल्याचे आढळले. तसेच ८२ टक्के अल्पभुधारक, ६९.२ टक्के मध्यम व ३९.१ टक्के मोठे शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड केली नसल्याचे आढळले.

निष्कर्ष

शेतकऱ्यांचा धानपिकावरील खर्च

- शोधकार्यात प्राप्त माहितीच्या सांख्यिकीय विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की अल्पभुधारक, मध्यम भुधारक व मोठे शेतकरी यांना भात पीकाच्या संदर्भात वेगवेगळया बाबींवर लागणारा खर्च यामध्ये सार्थक तफावत आहे.

कर्जविषयक माहिती

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश धान उत्पादक (अल्पभुधारक, मध्यम व मोठे) धानपिकाकरिता सहकारी बँकेकडून कर्ज घेतात.

धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे व्याजदर

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश धान उत्पादक अल्पभुधारक व मध्यम शेतकऱ्यांनी धानपिकाकरिता ८ टक्के व्याजदरावर कर्ज घेतले असून मोठे शेतकऱ्यांनी १० टक्के व्याजदरावर कर्ज घेतले आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे असे निदर्शनास येते की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश धान उत्पादक अल्पभुधारक व मध्यम शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड केली नसून मोठे शेतकऱ्यांनी धानपिकाकरिता घेतलेल्या कर्जाची परतफेड केली आहे.

आधारग्रंथ सुची

१. पुरोहित, व., कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०१६, पृ. १५.
२. कृषिसंवादिनी, २०१३, डॉ. पंजाबरा देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
३. कुंजीर, यु. डी. (२००८) राष्ट्रीय कृषी विमा योजना, शेतकरी, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. १ ते ३.

४. सागर, के. (२०१६) महाराष्ट्रातील जिल्हे, सतरावी आवृत्ती, पान क्र. २६६—२७२
५. घाटोळे. रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९—१०.पृ.क्र. १
६. बोधनकर सु, अलोनी वि., सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००३:८९
७. भांडारकर पु.ल. १९९२ सामाजिक संशोधन पद्धती श्री साईनाथ प्रकाशन नागपूर पृ. क्र. ३९७,४०१
८. जरारे वि., संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५—ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, १९९५:७९